# माहेर

कुपोषण निर्मुलनामध्ये शासनाबरोबर समाजाच्या सर्व घटकांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी शासन राजमाता जिजाऊ माता आरोग्य व पोषण अभियान राबवत आहे. या अभियानाद्वारे पहिले १००० दिवस बाळाचे - पंचसुत्री कार्यक्रमावर भर देण्यात आहे. गर्भवती मातेच्या पोटी साधारण किंवा चांगल्या वजनाचे बाळ जन्माला येण्यासाठी गर्भवत मातेस अतिरिक्त आहाराची गरज असते. महाराष्ट्रातील जन्मतः कमी वजनाच्या (LBW) बालकांचे प्रमाण कमी करण्यासाठी याबाबत जनजागृती, क्षमता बांधनी वर भर देण्यात येत आहे. या कामी लोकसहभाग मिळवताना अनेक नाविण्यपुर्ण कल्पना प्रत्यक्षात आल्या. अहमदनगर जिल्हयाने गर्भवती मातांना अतिरिक्त आहार देण्याची माहेर संकल्पना राबविली.

माहेर मधुन आदिवासी भागातील कुपोषण व बालमृत्यू कमी करण्यासाठी गरोदर मातांना एकवेळचा चौरस आहार देण्यात येतो. गरोदर मातेस तो आहार दु. १२.०० ते दु. १.०० यावेळेत अंगणवाडीत देण्यात येतो. आहार घेतल्यानंतर मातेस दोन तास विश्रांती दिली जाते. विश्रांती कालावधीत मातेस चौरस आहार, दवाखान्यात प्रसुती, जन्मतः बाळाचे वजन, अर्ध्या तासाच्या आत स्तनपान, चिकाच्या दुधाचे महत्व, सहा महिने निव्वळ स्तनपान, ६ महिन्यानंतर अंगावरील दुध व पुरक आहर असे दोन वर्षे बाळास देणे हे मार्गदर्शन सीडी, पुस्तक, मार्गदर्शिका, नाटीका यामधून पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका यांच्यामार्फत देण्यात येते.




राजुर प्रकल्पातील ठाकरवाडी विठा येथे दिनांक ३ एप्रिल, २०१४ पासून दुपारी १२.०० ते दु. २.०० या वेळेत अंगणवाडी सेविकेंची सहभागातून माहेर ही प्रायोगिक तत्वावर योजना राबविण्यात आली. या केंद्रामधुन ४ गर्भवती अतिरिक्त पोषणाचा लाभ देण्यात आला. त्यासाठी त्यांना लोक सहभागातून उपलब्ध केलेल्या अन्नधान्य, भाजीपाली, फळे इ. पासून चौरस आहार दिला गेला. याच बरोबर दोन तास विश्रांती, लोह गोळीचे प्रत्यक्ष सेवन व आरोग्य पोषण बाबतचे समुपदेशन केले गेले. गर्भावस्थेच्या शेवटच्या तिमाहितील प्रत्यक्षात दिड महिना या ४ गर्भवतींनी या योजनेचा लाभ घेतला. या सर्व गर्भवतींची